# मुंबई विद्यापीठ

विद्याविषयक नियोजन
आणि विकास विभाग

APD/ICD/432/20/2017-2018
१४ फेब्रुवारी, २०१८

परिपत्रक:—

विषय : दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८ रोजी ''मराठी भाषा गौरव दिन'' साजरा करणेबाबत

संदर्भ : शासन परिपत्रक क्रमांक: बैठक—२४१३/(प्र. क्र. ०४/१७)/ समन्वय तारीख २० जानेवारी, २०१८

उपरोक्त परिपत्रकान्वये महाराष्ट्र शासन व मा. कुलगुरूंच्या आदेशानुसार असे सुचित करण्यात येते की, मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या प्रत्येक महाविद्यालयात व विद्यापीठ विभागामध्ये **''मराठी भाषा गौरव दिन''** साजरा करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात यावा. त्यासाठी संलग्नित महाविद्यालयांनी तसेच विद्यापीठाच्या विविध विभागामध्ये/संस्थांमध्ये आपापल्या अर्थसंकल्पात आवश्यक ती आर्थिक तरतुद करावी व या दिनासाठी आपल्या संस्थेत सदर कार्यक्रम साजरा करण्याची रूपरेषा कशी तयार केली आहे अथवा करण्यात येत आहे त्याबाबतची माहिती सादर करावी.

आपणांस असे सुचित करण्यात येत आहे की, आपल्या महाविद्यालयातील वाङ:मय मंडळातर्फे **''मराठी भाषा गौरव दिन''** दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८ रोजी विविध उपक्रमांनी साजरा करावा व हया दिवसांनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन महाविद्यालयात/विद्यापीठ विभागामध्ये करावे. सदर कार्यक्रमांचे आयोजन केल्याचे स्वतंत्र अहवाल विद्यापीठास सहायक कुलसचिव, विद्याविषयक नियोजन आणि विकास विभाग, मुंबई — ४०० ०३२ येथे सादर करावा.

शासन परिपत्रक २०१७।१८ विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(डॉ. दिनेश कांबळे)
कुलसचिव

मुंबई— ४०० ०३२
१४ फेब्रुवारी, २०१८

To
The Principal of all Colleges
having NSS unit
Attn:- NSS Programme Officer
for information and necessary action.

प्रत रवाना —

N.S.S. PROGRAMME CO-ORDINATOR
University of Mumbai.

प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, संचालक/विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ यांच्या माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

By Hand
20/2/18